# पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA)

# भिवपुरी उदंचन-जलविद्यूत प्रकल्प

## (१००० MW)

## (सेक्टर १(c); श्रेणी "A")

## *कार्यकारी सारांश*

## फेब्रुवारी २०२४

*करिता:*

TATA POWER

**मेसर्स दि टाटा पॉवर कंपनी लि.**

---

*निर्मिती:*

RSET Environmental Consulting


**आर एस एन्व्हायरोलिंक टेक्नॉलॉजीज प्रा. लि.**

४०३, बेस्टेक चेंबर,

बी-ब्लॉक, सुशांत लोक-१, गुडगाव

फोन: +९१-१२४-४२९५३८३: www.rstechnologies.co.in


| | |
|---|---|
| आर एस एन्व्हायरोलिंक टेक्नोलॉजीज प्राइवेट लिमिटेड क्यूसीआई प्रमाणपत्र क्र. | NABET/EIA/२२२५/RA ०२७४ |
| AGSS विश्लेषणात्मक आणि संशोधन प्रयोगशाळा (प्रा) लि. | ISO-९००१: २०१५ मान्यताप्राप्त प्रयोगशाळा (NABL मान्यताप्राप्त चाचणी प्रयोगशाळा) |
| आधाररेखा आकड्यांची देखरेख कालावधी | पावसाळ्याच्या पूर्वी (एप्रिल-मे २०२३)<br>हिवाळा (डिसेंबर २०२३) |

## १. प्रस्तावना

अधिक वीज निर्मितीची वाढलेली मागणी आणि मागणी कमी असताना अतिरिक्त वीज उपलब्धता यांचा फायदा घेऊन टाटा पॉवरने भिवपुरी जलविद्युत केंद्र परिसरात उदंचन प्रकल्प बांधण्याची शक्यता तपासण्याची योजना आखली आहे. भिवपुरी ऑफ-स्ट्रीम ओपन लूप पंप्ड स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट (भिवपुरी PSP) महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भिवपुरी गावा जवळ आहे. हे कर्जत शहरापासून सुमारे २० किमी अंतरावर आहे. प्रकल्प स्थळ चांगल्या प्रकारे जोडलेली आहे. उर्ध्व (अस्तित्वातील ठोकरवाडी जलाशय) आणि निम्न हे दोन्ही जलाशय मुंबई आणि पुण्यातून विद्यमान रस्त्याने जोडलेली आहेत आणि मुंबईपासून सुमारे ८० किमी आणि पुण्यापासून ११५ किमी अंतरावर आहेत. सर्वात जवळचे आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथे आहे. भिवपुरी-जलविद्युत-प्रकल्प महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भिवपुरी गावा जवळ आहे. हे कर्जत शहरापासून सुमारे २० किमी अंतरावर आहे. प्रकल्पाचे स्थळ **नकाशा-१** मध्ये दर्शविले आहे.

१००० मेगावॅटची स्थापित क्षमता असलेल्या भिवपुरी उदंचन प्रकल्प (PSP) साठी तयार केलेल्या पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा उद्देश प्रकल्प संकल्पन, बांधकाम आणि कामाच्या दरम्यान निर्णय घेणाऱ्यांनी पर्यावरणीय प्रभावांचा विचार केला असल्याची खात्री करणे हा आहे. म्हणून, EIA दस्तऐवज प्रकल्पाच्या जवळपासच्या विविध पर्यावरणीय मापदंडांची पूर्व-प्रकल्प पर्यावरण गुणवत्ता स्थिती सादर करण्यासाठी, प्रकल्पाच्या आजूबाजूच्या क्षेत्रावरील परिणामांचा अंदाज घेण्यासाठी आणि अशा प्रभावांना कमी करण्यासाठी आणि व्यवस्थापन उपाय सुचवण्यासाठी तयार केले आहे. पर्यावरण मंजुरी प्रक्रियेचे वर्णन करणाऱ्या सप्टेंबर २००६ च्या केंद्रीय वन व पर्यावरण व वातावरणीय बदल (MoEFCC) यांच्या EIA अधिसूचनेनुसार अशा प्रकल्पांसाठी EIA अभ्यास अनिवार्य आहे.




**नकाशा-१: भिवपुरी पंप स्टोरेज प्रकल्पाचा दर्शक नकाशा**

## २. प्रकल्पाचे वर्णन

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील भिवपुरी गावाजवळ स्थित भिवपुरी ऑफ-स्ट्रीम ओपन लूप पंप्ड स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट (भिवपुरी PSP) मध्ये तात्पुरते कॉफरडॅम, अप्पर इनटेक सिस्टम, वॉटर कंडक्टिंग सिस्टम, सर्ज शाफ्ट, पिट पॉवर हाऊस, लोअर इनटेक सिस्टम आणि निम्न जलाशय (तळाशी निकासमार्गासह सुसज्ज) या योजनेत सध्याच्या ठोकरवाडी जलाशयाचा १२.४८५ TMC एकूण साठवण क्षमतेचा उर्ध्व जलाशय म्हणून वापर करणे आणि ०.१६३ TMC एकूण क्षमतेसह निम्न जलाशयाच्या निर्मितीसाठी १८९९.० मीटर लांबीचे जिओमेम्ब्रेन फेस रॉकफिल धरण बांधणे समाविष्ट आहे. संपूर्ण योजनेत १००० मेगावॅट (४x२००+२x१००) निर्मितीसाठी २१६.७ cumec विसर्गाचा वापर करण्याचे प्रस्तावीत आहे. १७३.२० cumec च्या संकल्पीत विसर्गासह ५२०.४० मीटरचे रेटेड-नेट-हेड ८०० मेगावॅट (प्रत्येकी २०० मेगावॅटचे ४ युनिट) आणि ४३.६० क्यूमेक संकल्पीत विसर्गासह ५१६.६० मीटरचे रेटेड-नेट-हेड २०० मेगावॅट (प्रत्येकी १०० मेगावॅटचे २ युनिट) निर्मितीसाठी वापरले जाईल. प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये **तक्ता १** मध्ये दिली आहेत आणि प्रस्तावित भिवपुरी PSP चा रेखांकन नकाशा आणि **नकाशा- २** येथे दर्शविलेला आहे.

**तक्ता १: भिवपुरी PSP ची ठळक वैशिष्ट्ये**

| | | |
|---|---|---|
| **१** | **ठिकाण** | |
| | देश | भारत |
| | राज्य | महाराष्ट्र |
| | जिल्हा | रायगड |
| **२** | **प्रकल्पा पर्यंत पोच** | |
| | रस्ता | मुंबईपासून ८० किमी महामार्गावरून प्रवेश करता येतो |
| | जवळचे विमानतळ | मुंबई विमानतळ |
| **३** | **प्रकल्प** | |
| | प्रकार | उदंचन जलविद्यूत प्रकल्प |
| | स्थापित क्षमता | १००० मेगावॅट (४x२००+२x१००) |
| | अधिक निर्मिती कालावधी | ६ तास |
| | पंपिंग कामाचा कालावधी | ६ तास ४२ मिनिटे |
| **४** | **जलाशयाची पातळी आणि साठवण इ. तपशील** | |
| **४.१** | **ऊर्ध्व जलाशय (विद्यमान)** | |
| | अक्षांश रेखांश | १८° ५६' ९.३४" उ/ ७३° २९' १४.५९" पु |
| | FRL (पूर्ण संचय पातळी) | ६६७.१७ m |
| | MDDL (महत्तम जलरिक्तीकरण पातळी) | ६४६.१८ m |
| | जिवंत साठा | FRL वर ३५३.५२ MCM |
| **४.२** | **निम्न जलाशय (नवीन प्रस्तावित)** | |
| | अक्षांश रेखांश | १८° ५६' ३५.३६" उ/ ७३° २६' ३९.८१" पु |
| | FRL (पूर्ण संचय पातळी) | १३२.० m |
| | MDDL (महत्तम जलरिक्तीकरण पातळी) | ९९.०० m |
| | एकूण साठा | ४.६१३ MCM |
| | जिवंत साठा | ४.५७७ MCM |
| **५** | **स्थापत्य बांधकामांचा तपशील** | |
| **५.१** | **निम्न जलाशय (नवीन प्रस्तावित)** | |
| | धरणाचा प्रकार | GFRD (Geo-membrane Rock Filled Dam) – दगडी धरण |
| | धरण माथा पातळी | १३५.० मीटर |

| | | |
|---|---|---|
| | धरणाची कमाल उंची | २८.०० मीटर |
| | धरणाची लांबी | १८९९.०० मीटर |
| **५.२** | **ऊर्ध्व जलाशयातील इनटेक** | |
| | प्रकार | विसारक प्रकार (Diffuser Type) |
| | Intake संरचनेची संख्या | १ नग |
| | ट्रॅश रॅक-बे ची संख्या | ४ नग |
| | ट्रॅश रॅक-बे चा आकार | ६.२० m (रुंदी) x १२.३० m (उंची) |
| | ट्रॅश रॅक पॅनेलचा आकार | २० नग [६.७० m (रुंदी) x २.६६ m (उंची) प्रत्येक] ०५ नग प्रत्येक पॅनेलमधील संख्या |
| | ट्रॅश रॅकची सिल पातळी | ६२९.०० m |
| | इनटेक-कंड्युटची तळाची पातळी | ६२९.०० m |
| | सेवा गेटचे क्रमांक आणि आकार | १ नग- ६.५ m (रुंदी) x ८.३ m (उंची) |
| | स्टॉपलॉग गेटचे क्रमांक आणि आकार | १ नग- ६.५ m (रुंदी) x ८.३ m (उंची) |
| | डिझाईन डिस्चार्ज–संकल्पीत विसर्ग (प्रत्येक इनटेक) | २१६.८० Cumec |
| **५.३** | **निम्न जलाशयातील इनटेक** | |
| | प्रकार | विसारक प्रकार (Diffuser Type) |
| | Intake संरचनेची संख्या | ५ नग |
| | ट्रॅश रॅक-बे ची संख्या | ४ नग प्रति प्रवेश ठिकाण (एकूण २० नग कचरा रॅक बे) |
| | ट्रॅश रॅक-बे चा आकार | ४.१० m (रुंदी) x ५.० m (उंची) |
| | ट्रॅश रॅक पॅनेलचा आकार | आकार ४.६० m (रुंदी) x २.० m (उंची) |
| | ट्रॅश रॅकची सिल पातळी | ७५.० m |
| | इनटेक-कंड्युटची तळाची पातळी | ७४.६० m |
| | सेवा गेटचे क्रमांक आणि आकार | ५ नग - ३.४० m (रुंदी) x ४.५० m (उंची) |
| | स्टॉपलॉग गेटचे क्रमांक आणि आकार | १ नग- ३.४० m (रुंदी) x ४.५० m (उंची) |
| | रेटेड डिझाईन डिस्चार्ज–संकल्पीत विसर्ग (प्रत्येक इनटेक) | ४३.३० $m^3/s$ |
| **५.४** | **अधिजल बोगदा [Head Race Tunnel - HRT]** | |
| | आकार (finish shape & size) | गोलाकार - ८.३ m व्यास, संधानक (concrete) लेप (lined) |
| | लांबी | १९८१.७० m |
| | डिझाईन डिस्चार्ज-संकल्पीत विसर्ग | २१६.८० Cumec |
| **५.५** | **सर्ज शाफ्ट** | |
| | आकार (finish shape & size) | वर्तुळाकार - २०.० m व्यास |
| | महत्तम सर्ज (लाट) | ६८९.५० m |
| | न्युनतम सर्ज (लाट) | ६०९.५० m |
| | सर्ज शाफ्टची माथा पातळी | ६९१.५० m |
| | सर्ज शाफ्टची तळाची पातळी | ५६६.४२ m |
| | ओरीफिसचा व्यास | ४.५० m |
| **५.६** | **भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका (पेनस्टॉक) आणि दाब-बोगदे (डावीकडील दुभाजक)** | |
| **५.६.१** | भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका | १ नग |
| | आकार आणि प्रकार | ५.३० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | १४४.५३ Cumec |
| | लांबी | ६७८.४० m |
| **५.६.२** | भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका | १ नग |
| | आकार आणि प्रकार | ४.३ m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ९६.३५ Cumec |
| | लांबी | ५२९.० m |

| | | |
|---|---|---|
| **५.६.३** | भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका | २ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ४८.१८ Cumec |
| | लांबी | ७६८.९४ m |
| **५.६.४** | भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका | १ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ४८.१८ Cumec |
| | लांबी | १२४५.२२ m |
| **५.६.५** | युनिट प्रेशर शाफ्ट | २ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.०० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग | ४८.१८ Cumec |
| | लांबी | १८२.७० m |
| **५.६.६** | प्रेशर शाफ्ट | १ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.०० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग | ४८.१८ Cumec |
| | लांबी | १८२.७० m |
| **५.६.७** | युनिट प्रेशर शाफ्ट | २ नग |
| | आकार आणि प्रकार | २.१५m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग | २४.०९ Cumec |
| | लांबी | ५२.७२ m |
| **५.७** | **भूपृष्ठीय/भूमीगत दाबनलिका (पेनस्टॉक) आणि दाब-बोगदे (उजवीकडील दुभाजक)** | |
| **५.७.१** | पृष्ठभाग पेनस्टॉक | १ नग |
| | आकार आणि प्रकार | ४.३० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ९६.३६ Cumec |
| | लांबी | १२९३.५० m |
| **५.७.२** | पृष्ठभाग पेनस्टॉक | २ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.०० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ४८.१८ Cumec |
| | लांबी | ६०५.७६ m |
| **५.७.३** | युनिट प्रेशर शाफ्ट | २ नग |
| | आकार आणि प्रकार | ३.०० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग (प्रत्येकी) | ४८.१८ Cumec |
| | लांबी | १७२.५० m |
| **५.८** | **वीजगृह** | |
| | अक्षांश | १८° ५६' १९.६५" उ |
| | रेखांश | ७३° २६' ५६.७३" पु |
| | प्रकार | खड्डा-प्रकार चे पॉवरहाऊस (pit type) |
| | स्थापित क्षमता | १००० मेगावॅट (४x२००+२x१००) |
| | संचांची संख्या | ६ नग |
| | पाणचक्यांचा प्रकार | रिव्हर्सीबल फ्रान्सिस, उभे-शाफ्ट |
| | वीजगृहाच्या भूमितीय मध्याची रेखा | ५६.०० m |
| | वीजगृहाचा आकार | २०७.५० m लांब x २४ m रुंद x ५२ |
| | डिझाइन हेड (निर्मिती प्रणालीमध्ये) | २००MW युनिटसाठी ५२०.४०m; १००MW युनिटसाठी ५१६.६०m |
| | डिझाइन हेड (उपसा प्रणालीमध्ये) | २००MW युनिटसाठी ५५३.८०m; १००MW युनिटसाठी ५५६.३०m |
| | सेवा-बे पातळी | ७०.०० m |
| **५.९** | **वीजगृहाकडे जाण्याचा रस्ता** | |

| | | |
|---|---|---|
| | रुंदी | ७.० m |
| | लांबी | १२००.०० m |
| | पोहोच रस्त्याची पातळी | १२६.०० m |
| | निर्गत रस्त्याची पातळी | ७०.०० m |
| **५.१०** | **रोहित्र आणि GIS हॉल** | |
| | प्रकार | भूपृष्ठीय |
| | जनित्र-बे आकार | २०७.५५ m x १७.० m x २३.० |
| **५.११** | **अवजल बोगदा** | |
| **५.११.१** | जलविद्यूत-संचनिहाय अवजल बोगदा | २ नग, (१०० MW युनिट पासून) |
| | आकार आणि प्रकार | ३.२० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग | २४.०९ Cumec |
| | लांबी | ७७.८७ m |
| **५.११.२** | मुख्य अवजल बोगदा | ५ नग |
| | आकार आणि प्रकार | ४.५० m व्यास, गोलाकार, स्टील लेप |
| | संकल्पीत विसर्ग | ४८.१८ Cumec |
| | लांबी | १९१.४१ m (लहान युनिट्सशी जोडलेले)<br>२३०.२१ m (मोठ्या युनिटशी जोडलेले) |
| **५.१२** | **पॉटहेड यार्ड** | |
| | प्रकार | भूपृष्ठीय |
| | आकार | १३५.० m (लांब) x ५१.० m (रुंद) |
| **६** | **विद्युत-यांत्रिकी उपकरणे** | |
| **६.१** | **वीजनिर्मिती प्रणाली** | |
| | पाणचक्क्याचा प्रकार | रिव्हर्सीबल फ्रान्सिस, उभे-शाफ्ट |
| | महत्तम निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ५४९.३७मी; १००MW युनिटसाठी ५४५.५७ मी |
| | न्युनतम निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ४९१.३८ मी; १००MW युनिटसाठी ४९१.५८ मी |
| | रेटेड निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ५२०.३७ मी; १००MW युनिटसाठी ५१६.५७ मी |
| | संकल्पीत उंची | २००MW युनिटसाठी ५३१.३७ मीटर; १००MW युनिटसाठी ५२७.५७ मी |
| **६.२** | **उपसा प्रणाली** | |
| | महत्तम निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ५८२.८७ मी; १००MW युनिटसाठी ५८५.२७ मी |
| | न्युनतम निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ५२८.८८ मी; १००MW युनिटसाठी ५३१.२८ मी |
| | रेटेड निव्वळ उंची | २००MW युनिटसाठी ५५३.८७ मीटर; १००MW युनिटसाठी ५५६.२७ मी |
| | संकल्पीत उंची | २००MW युनिटसाठी ५६४.८७ मीटर; १००MW युनिटसाठी ५६७.२७ मी |
| | संच-निहाय संकल्पित विसर्ग | ६ युनिट्ससाठी |
| | निर्मिती प्रणालीमध्ये | २००MW युनिटसाठी ४३.२३ क्युमेक; १००MW युनिटसाठी २१.७८ क्युमेक |
| | उपसा प्रणालीमध्ये | २००MW युनिटसाठी ३८.७८ क्युमेक; १००MW युनिटसाठी १९.३० मी |
| **६.३** | **जनित्र मोटार** | |
| | जनित्राचा प्रकार | अनुलंब शाफ्ट, सिंक्रोनस जनरेटर, निलंबित प्रकार |
| | पाणचक्की कार्यक्षमता (निर्मिती प्रणालीमध्ये) | ०.९२ |

| | | |
|---|---|---|
| | पाणचक्की कार्यक्षमता (उपसा प्रणालीमध्ये) | ०.९३ |
| | जनित्राची कार्यक्षमता | ९८.५०% |
| | synchrinous speed | २००MW युनिटसाठी ३७५ rpm; १००MW युनिटसाठी ५०० rpm |
| **७** | **वार्षिक ऊर्जा** | |
| | निर्मितीसाठी वार्षिक ऊर्जा | २०७९.४२ MU |
| | निर्मिती कालावधी (कमाल) | ६ तास |
| | पंपिंगसाठी वार्षिक ऊर्जा | २५७८.९७ MU |
| | पंपिंग कालावधी | ६ तास ४२ मिनिटे |

प्रस्तावित प्रकल्प ४८ कॅलेंडर महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजित आहे (१७ महिने बांधकाम-पूर्व कालावधी वगळून) कामे प्रदान केल्यानंतर निविदा, मूल्यमापन आणि निवाड्याचे काम जलदगतीने केले जाईल जेणेकरुन कामाच्या कालावधीच्या सुरूवातीस कंत्राटदार बांधकामास सुरूवात करेल.

## अ. प्रकल्प बांधकामासाठी जमिनीची आवश्यकता

भिवपुरी उदंचन प्रकल्पासाठी एकूण अंदाजे ११७.४१ हे जमिनीची आवश्यकता आहे. ज्यापैकी २०.१५ हे. वनजमीन आहे; तर ९७.२६ हे. वनेतर जमीन आहे. ९७.२६ हे. वनेतर जमिनीपैकी ९३.८२ हे. जमीन टाटा पॉवरच्या मालकीची आहे आणि ३.४४ हे. असलेली खाजगी जमीन ही पोहोच रस्त्यासाठी आणि अधीजल बोगद्यासाठी आवश्यक आहे.




| DESCRIPTION | | LENGTH (M) |
|---|---|---|
| FROM | TO | |
| EXISTING ROAD | UPPER INTAKE GATE SHAFT | 568.00 |
| EXISTING ROAD | SURGE SHAFT | 517.00 |
| EXISTING ROAD | BUTTERFLY VALVE HOUSE | 1390.00 |
| EXISTING ROAD | PENSTOCK (AT DIFFERENT LOCATIONS) | 1561.00 |
| EXISTING ROAD | POWER HOUSE | 555.00 |
| ROAD TO POWER HOUSE | LOWER DAM TOP | 176.00 |
| TOTAL LENGTH (M) | | 4767.00 |

LEGEND:-

- DAM TOP
- EXISTING ROAD
- FRL BOUNDARY
- PROPOSED PROJECT ROAD
- PROJECT LAND REQUIREMENT BOUNDARY
- LAND BOUNDARY (TATA)

NOTES

1. ALL DIMENSIONS ARE IN MM, RD'S AND ELEVATIONS IN METER. UNLESS OTHERWISE SPECIFIED.
2. DIMENSIONS SHALL NOT BE OBTAINED BY SCALING THE DRAWINGS. ONLY WRITTEN DIMENSIONS SHALL BE FOLLOWED.
3. FOR COMPONENTS DETAIL REFER SEPARATE DRAWING.

| No | Revision | SMEC | Date |
|---|---|---|---|
| B | REVISED AS PER CLIENT'S COMMENTS. | PA | Jan'24 |
| A | ISSUED FOR DPR PURPOSE ONLY. | PA | Dec'23 |

CLIENT: TATA POWER — The Tata Power Co. Ltd. The Tata Power Co. Ltd.,Corporate Centre B Block34, Sant Tukaram RoadMumbai 400009

SCALES FOR A1: SCALE 1 : 6500 — 65 0 65 130 195 260 325m

CONSULTANT: SMEC India — Member of the Surbana Jurong Group. 1st Floor, West Wing,Novus Tower Plot-18,Sec-18 Gurgaon - 122008 (Haryana) Tel: 91-124-4501100

Drawn: MDL/SS Dec'23; Design: RR Dec'23; Drafting Check: MDL Dec'23; Design Check: VG Dec'23; Design Review: VG Dec'23; SUBMITTED: PA Dec'23

Project: BHIVPURI PUMPED STORAGE PROJECT (4x200+2x100MW)

Title: PROJECT GENERAL LAYOUT PLAN

Original Size: A1 | Drawing Status: DPR | Drawing No.: 7061707-GEN-09 | Rev: B

**नकाशे २: भिवपुरी उदंचन प्रकल्पाचा रेखांकन नकाशा**

## ३. पर्यावरणाची माहिती

MoEF&CC द्वारा नुकतेच दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजीच्या कार्यालयीन परिपत्रकानुसार जारी केलेल्या PSP-विशेष TOR नुसार, भिवपुरी PSP प्रकल्पाचा EIA दोन हंगामाच्या (पावसाळा व्यतिरिक्त) माहितीवर आधारित आहे. त्यानुसार, प्रस्तावित EIA अभ्यासासाठी संदर्भीत मंजूर TOR अटींनुसार माहे एप्रिल-मे २०२३ आणि माहे डिसेंबर २०२३ मध्ये रेखाटलेल्या अभ्यास क्षेत्रातील विद्यमान पर्यावरणीय मापदंडांवर आधारीत प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी अभ्यास क्षेत्रात सर्वेक्षण करण्यात आले. केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने (MoEF&CC) चे मान्सूनपूर्व/उन्हाळा हंगाम आणि हिवाळी हंगामाची माहिती प्रकल्पाच्या ठिकाणी सध्याच्या वातावरणाची स्थिती समजून घेण्यासाठी वापरण्यात आलेली आहे. वरील निकषांच्या आधारे तयार केलेल्या अभ्यास क्षेत्राचा नकाशा **नकाशा ३** मध्ये दिलेला आहे.

### अ. फिजिओग्राफी

प्रस्तावित प्रकल्पाचे अभ्यास क्षेत्र समुद्रसपाटीपासून ३६.० मीटर ते १०९८ मीटर उंचीच्या दरम्यान स्थित आहे. प्रकल्प अभ्यास क्षेत्रापैकी सुमारे ४१.५% क्षेत्र २०० मीटर उंचीच्या खाली आहे आणि सुमारे २०% अभ्यास क्षेत्र ६०० मीटर ते ७०० मीटर उंचीच्या पट्ट्यात आहे आणि सुमारे ३२% अभ्यास क्षेत्र ६०० मीटर ते ८०० मीटर उंचीच्या पट्ट्यात आहे. सध्याच्या ठोकरवाडी जलाशयाजवळील बहुतेक क्षेत्र आणि जलवहन प्रणाली ६०१-७०० मीटर उंचीच्या श्रेणीखाली येत आहे. निम्न जलाशयाचे क्षेत्र १०१-२०० मीटर पातळीवर आहे.

स्थलाकृतिचा उतार मंद उतार (०-२ अंश) ते मध्यम उतार (२-८ अंश) आहे. त्यामुळे, सुमारे ६२.३९% क्षेत्र या श्रेणीमध्ये येत आहे.

### आ. भूशास्त्र

प्रस्तूत प्रकल्प हा पश्चिम घाट आणि दख्खनच्या पठाराचा भाग आहे. जिल्ह्याच्या भौतिकशास्त्राचे खाली नमूद चार प्रमुख वैशिष्ट्यपूर्ण भूस्वरूपे आहेत.

१. डोंगर आणि घाटमाथा
२. पायथा
३. पठार आणि
४. मैदाने

प्रस्तूत प्रकल्पीय क्षेत्र दख्खनच्या पठाराच्या उपप्रांताच्या पश्चिमेकडील पूर्ववर्ती काठावर वसलेले आहे. प्रकल्प क्षेत्र इंद्रायणी भूशास्त्रीय निर्मिती (लोणावळा उपसमूहाचे), अप्पर रतनगड भूशास्त्रीय निर्मिती, लोअर रतनगड भूशास्त्रीय निर्मिती आणि साल्हेर भूशास्त्रीय निर्मिती (कळसूबाई उपसमूहाचे) दख्खन बेसॉल्ट्सच्या सह्याद्री गटात आहे.

### इ. जलविज्ञान

प्रस्तावित भिवपुरी उदंचन प्रकल्प (PSP) मध्ये विद्यमान ठोकरवाडी जलाशय (ऊर्ध्व जलाशय) आणि प्रस्तूत निम्न जलाशय [टाटा पॉवरच्या खाजगी जमीनीवर] पाण्याचा पुनर्वापर करून कमाल मागणीच्या कालावधीत वीज निर्मिती करणे संकल्पीत आहे. या योजनेत विद्यमान ठोकरवाडी जलाशयातील पाण्याचा वापर करण्याचे प्रस्तावित असल्याने आणि पाण्याचा वापर 'उपभोग्य' म्हणजेच consumptive-स्वरूपात वापर होत नसल्याने (बाष्पीभवन आणि इतर अनुषंगिक तूट इ.सह), पाण्याची उपलब्धता तसेच संकल्पीत पूर यांची शक्यता नाही. निम्न-जलाशयातून होणाऱ्या बाष्पीभवन-तूट ०.४३ MCM असून ते ऊर्ध्व जलाशयातून नियतकालीक भरून काढण्याचे प्रस्तावीत आहे.

प्रस्तावित निम्न जलाशयाच्या पृष्ठभागावर पडणा-या पावसाच्या पाण्याचे जलशास्त्रीय आकडेमोड करून प्राप्त होणारा येवा योग्यरित्या खाली प्रवाहित केला जाईल. परिचलनीय व देखभाल-दुरूस्ती कालावधीतील पाण्याची तूट विद्यमान ऊर्ध्व जलाशयातून भरून काढले जाईल.




आकृती ३.३: नकाशा अभ्यास क्षेत्र दर्शवित आहे

### ई. जमिनीचा वापर/जमीन आच्छादन

भिवपुरी (PSP) च्या अभ्यास क्षेत्रात, सदाहरित/निम-सदाहरित, पानझडी आणि झाडी जंगलचा ३८.८३% इतका भाग आहे. बहुतेक वनक्षेत्र हे सदाहरित/ निम-सदाहरित असून तो २१.९०% इतके व्यापलेले आहे, तर ९.०४% आणि ७.८९%, अभ्यास क्षेत्र अनुक्रमे पानझडी आणि खुरट्या जंगलचा समावेश आहे. २७.३४ % अभ्यास क्षेत्र सिंचनाखाली आहे (पीक क्षेत्र आणि शेती लागवड).

### उ. हवामानशास्त्र

प्रकल्पाचे अभ्यास क्षेत्र पुणे आणि रायगड जिल्ह्यात आहे, ज्यात पावसाळा वगळता बहुतांशी उष्ण उन्हाळा आणि कोरडे हवामान असते. एप्रिलमध्ये सरासरी कमाल तापमान ३५.९°C नोंदवले गेले आहे. जानेवारीत सरासरी किमान तापमान १७.६°C नोंदवले गेले आहे. नैऋत्य मान्सूनमध्ये म्हणजेच जून ते सप्टेंबर दरम्यान या भागात सर्वाधिक पाऊस पडतो. अभ्यास क्षेत्रातील सरासरी आर्द्रता ९१% इतके असते आणि पावसाळा हंगाम वगळता, संपूर्ण वर्षभर आर्द्रता कमी असते. मे महिन्यात वाऱ्याचा सरासरी कमाल वेग ५.० m/s आहे.

### ऊ. माती

अभ्यास क्षेत्रात चिकणमाती आणि वालुकामय चिकणमाती आहे. सर्वसाधारणपणे, सर्व भौतिक आणि रासायनिक माती-गुणवत्तेचे निर्देशक मातीची चांगली गुणवत्ता दर्शवतात. NPK च्या दृष्टीने पोषक निर्देशांकावर आधारित मातीची सुपीकता नायट्रोजन 'कमी' असल्याचे दर्शवते; तर फॉस्फरस आणि पोटॅशियम यांचा 'मध्यम' पोषक निर्देशांक दर्शवतो.

### ऋ. पर्यावरणीय हवेची आणि आवाजाची गुणवत्ता

औद्योगिक, निवासी, ग्रामीण आणि इतर क्षेत्रे आणि पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांसाठी राष्ट्रीय पर्यावरणीय हवेच्या गुणवत्ता मानकांचे पालन करून पर्यावरणीय हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण केले गेले. तथापि, सर्व ठिकाणावरील PM२.५, PM१०, SO२, आणि NO२ चे प्रमाण CPCB द्वारे अधिसूचित नॅशनल ॲम्बियंट एअर क्वालिटी स्टँडर्ड २००९ द्वारे निर्धारित निवासी आणि ग्रामीण क्षेत्राच्या अनुज्ञेय मर्यादेत आहेत.

निरीक्षणाचे परिणाम असे दर्शवतात की सर्व ठिकाणवरील PM२.५, PM१०, SO२ आणि NO२ पातळी CPCB द्वारे अधिसूचित नॅशनल ॲम्बियंट एअर क्वालिटी स्टँडर्ड २००९ द्वारे निर्धारित निवासी आणि ग्रामीण क्षेत्राच्या अनुज्ञेय मर्यादेत आहेत. CPCB च्या AQI कॅल्क्युलेटरमध्ये PM२.५, PM१०, SO२, आणि NO२ स्तरांची २४ तासांची सरासरी वापरून हवेच्या गुणवत्तेचे देखील मूल्यांकन केले गेले आणि AQI मूल्यांची गणनेनुसार AQI मूल्ये अभ्यास क्षेत्रात 'समाधानकारक' आणि 'चांगली' या श्रेणीत येतात.

### ऌ. पाण्याची गुणवत्ता

अभ्यास क्षेत्रातील भूपृष्ठीय तसेच भूजल गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी पाण्याच्या गुणवत्तेची माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**भूपृष्ठीय पाणी**

• सर्व नमुने CPCBच्या पाणी-गुणवत्ता निकषांनुसार वन्यजीव आणि मत्स्यपालनाच्या प्रसाराचा सर्वोत्तम वापर म्हणून जैवरासायनिक ऑक्सिजन (म्हणजेच >३mg/l) मागणीमुळे वर्ग 'डी' अंतर्गत येतात. एकूण कोलिफॉर्मची संख्या ५०० MPN/१०० ml पेक्षा कमी आहे, pH ६.५ ते ८.५ दरम्यान आहे आणि विरघळलेला ऑक्सिजन ५ mg/l पेक्षा जास्त आहे.

• सिंचनाच्या पाण्याची उपयुक्तता तसेच SAR व EC च्या वर्गीकरणानुसार, सिंचनाच्या दृष्टीने पाण्याची उपयुक्तता 'मध्यम' आहे.

• CPCB मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे तसेच अभ्यास क्षेत्रातील वर नमूद मोजलेले पाण्याचे WQI हे 'चांगले' ते 'मध्यम' श्रेणीमध्ये आहेत.

**भूजल**

• पिण्याच्या पाण्याच्या BIS मानकांनुसार (२०१२), अभ्यास क्षेत्रातून गोळा केलेले सर्व भूजल नमुने त्याच्या अनुज्ञेय मर्यादेत येतात.

• DWQI नुसार भूजलाचे सर्व नमुने 'उत्कृष्ट' पाण्याच्या दर्जाच्या वर्गात येतात.

• सर्वसाधारणपणे, हिवाळ्याच्या हंगामात गौळवाडी गावाजवळील GW७ ठिकाणांवर भूजल "मृदू पाणी" श्रेणी अंतर्गत आहे आणि उर्वरित ठिकाणी 'मध्यम जड' ते "अतिजड पाणी" श्रेणीमध्ये आहे.

## ऍ. वनस्पती विविधता

प्रकल्प क्षेत्र महाराष्ट्र वन विभागाच्या पुणे आणि अलिबाग वनविभागात येते. चॅम्पियन आणि सेठ (१९६८) यांच्या 'भारताच्या वन प्रकारांचे सुधारित सर्वेक्षण' (१९६८) नुसार प्रमुख वनक्षेत्र गट २: उष्णकटिबंधीय निम-सदाहरित वन आणि गट ५: उष्णकटिबंधीय शुष्क पाणझड अंतर्गत येते.

क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान अभ्यास क्षेत्रातून १२३ फुलझाडे प्रजातींची नोंद करण्यात आली. अभ्यास क्षेत्रातून नोंदवलेल्या वनस्पती प्रजातींची तपशीलवार यादी प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे केली गेली असून उपलब्ध दुय्यम माहितीसह त्याची पुष्टी करण्यात आली आहे. फुलझाडे प्रजातींच्या २६७ प्रजातींची यादी तयार करण्यात आली, ज्यामध्ये वनक्षेत्र, झाडी जमीन, शेतजमीन आणि वसाहती, पडीक जमीन इत्यादींमध्ये वाढणाऱ्या ७५ वनस्पती प्रजातींचा समावेश आहे. या यादीमध्ये झाडांच्या १०९ प्रजाती, झुडुपांच्या ४९ प्रजाती, औषधी वनस्पतींच्या ५१ प्रजाती, वेलींच्या ३३ प्रजाती आणि गवतांच्या २५ प्रजातींचा समावेश आहे. बहुतांश वनस्पती प्रामुख्याने वनक्षेत्रात आढळतात. ज्यानंतर Poaceae (२४ प्रजाती), लॅमियासी (१५ प्रजाती), Acanthaceae (१३ प्रजाती), रुबियासी (१२ प्रजाती), कॉम्ब्रेटेसी (१०) आणि मालवेसी (१०) इ.चा समावेश आहे.

बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाने प्रकाशित केलेल्या भारतीय वनस्पतींच्या धोक्याच्या यादीनुसार, अभ्यास क्षेत्रातून कोणत्याही स्थानिक किंवा RET प्रजातींची नोंद झाली नाही. IUCN च्या रेड लिस्टनुसार (thretened species) २०२३-१, २ वनस्पती प्रजाती उदा. Tectona Grandis (टीक) आणि Syzygium zeylanicum (जांभुळ) लुप्तप्राय (EN) श्रेणी अंतर्गत सूचीबद्ध आहेत, Strobilanthes ciliate (वाडी कारवी), Garcinia indica (भेरंडा), Actinodaphne hookeri (पिसा), Dalbergia latifolia (काळारुख) आणि Santalum Album(चंदन) धोक्याचा श्रेणी (VU) आणि Dalbergia horrida (काटेरी डालबर्गिया), Pterocarpus marsupium (बिबला) आणि Aegle marmelos (बेल) हे IUCN २०२३-१ च्या धोक्याच्या जवळ (NT) श्रेणी अंतर्गत सूचीबद्ध आहेत. इतर प्रजाती Least Concerned किंवा Data Deficient श्रेणी-अंतर्गत सूचीबद्ध आहेत.

## ऐ. प्राणी विविधता

**सस्तन प्राणी:** प्रकल्प परिसरात सस्तन प्राण्यांचे दर्शन फारच दुर्मिळ आहे. सांबर (रुसा युनिकलर), बोनेट मकाक (केरडा) आणि नॉर्दर्न प्लेन ग्रे लंगूर (हनुमान माकड) या अभ्यास क्षेत्रात आढळलेल्या एकमेव सस्तन प्राण्यांच्या प्रजाती होत. क्षेत्रीय सर्वेक्षण आणि गावकऱ्यांकडून संकलीत माहितीच्या आधारे आणि वन कार्य योजना, प्रस्तावित प्रकल्पाच्या अभ्यास क्षेत्रातून नोंदवलेल्या सस्तन प्राण्यांच्या १७ प्रजातींची यादी संकलित करण्यात आली.

**पक्षी:** अभ्यास क्षेत्रातील क्षेत्र सर्वेक्षणादरम्यान पक्ष्यांच्या ९ व्या परिशिष्ठातील एकूण १९ प्रजातींची नोंद करण्यात आली. व्हाईट-ब्रेस्टेड किंगफिशर, एशियन ग्रीन बी-इटर (वेडा राघू), रेड-वॉटल्ड लॅपविंग (टिटवी), रॉक डोव्ह (कबूतर), ग्रेटर कौकल (भारद्वाज), रेड-व्हेंटेड बुलबुल (लाल बुडाचा बुलबुल), इंडियन पॉन्ड हेरॉन(सारंग), आणि लिटिल कॉर्मोरंट (लहान पाणकावळा) इ. सामान्यतः आढळणारे पक्षी या अभ्यास क्षेत्रात वारंवार दिसून येतात.

**सरपटणारे प्राणी:** संबंधित वनविभाग आणि स्थानिक लोकांचा वन कार्य आराखडा पाहता सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १३ प्रजाती आणि उभयचरांच्या ४ प्रजातींची यादी तयार करण्यात आली आहे.

**फुलपाखरे:** हा परिसर फुलपाखरांच्या विविधतेने आणि घनतेने समृद्ध आहे. सर्वेक्षणादरम्यान, निम्फॅलिडे कुटुंबातील ६ प्रजाती, आणि पॅपिलिओनिडी कुटुंबातील १ प्रजाती क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान दिसल्या.

**मासे:** प्रकल्प क्षेत्रातील मत्स्यजीवांच्या दस्तऐवजीकरणासाठी आंध्र आणि इंद्रायणी नदीत प्रायोगिक मासेमारी करण्यात आली. माशांच्या २ प्रजाती उदा. जायंट डॅनियो (डेव्हारियो मालाबेरिकस) आणि द गंगेटिक मायस्टस (मायस्टस कॅव्हॅसियस) आणि ३ प्रजातींच्या खेकड्यांच्या ०३ उप-प्रजाती होत्या. डहाणूकर एट अल (२०१२) द्वारे सार्वजनिक सल्लामसलत आणि इतर साहित्य अभ्यासले असता, अभ्यास क्षेत्रात माशांच्या १८ प्रजातींची यादी नोंदवली गेली आहे.

**संवर्धन स्थिती:** वन्यजीव संरक्षण दुरुस्ती कायदा, २०२२ नुसार, १० सस्तन प्राण्यांच्या प्रजाती, पक्ष्यांची एक प्रजाती, सरपटणा-या प्राण्यांच्या ०४ प्रजाती अनुसूची I अंतर्गत सूचीबद्ध आहेत.

IUCN ची Red list नुसार, आवृत्ती २०२३-१ नुसार, बिबट्या, झिप्रे अस्वल, सांबर हरण, भारतीय रानगवा आणि माकड असुरक्षित (VU) श्रेणी अंतर्गत आणि पट्टेरी तरस धोक्या जवळच्या (NT) श्रेणी अंतर्गत सूचीबद्ध आहेत.

## ए. संरक्षित क्षेत्राच्या जवळ

प्रकल्पाचा कोणताही घटक कोणत्याही अधिसूचित/संरक्षित क्षेत्रात येत नाही. प्रकल्प घटकांसाठी सर्वात जवळचे संरक्षित क्षेत्र भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य आहे; जे प्रकल्प क्षेत्रापासून सुमारे १०.७० किमी अंतरावर आहे.

## ऐ. सामाजिक पर्यावरण

भिवपुरी PSP (१००० MW) चे संपूर्ण अभ्यास क्षेत्र पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांतर्गत येते. या प्रकल्पामध्ये अभ्यास क्षेत्रातील एकूण ९१ गावांचा समावेश आहे. ९१ गावांपैकी ६७ गावे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात आहेत आणि उर्वरित २४ गावे पुणे जिल्ह्यात आहेत (५ गावे खेड तालुक्यात आणि १९ गावे मावळ तालुक्यात).

अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या ६९०६८ असून, ३५२१४ (५०.९८%) पुरुष आणि ३३८५४ (४९.०१%) महिला आहेत. लिंग गुणोत्तर १००० पुरुषांमागे ९६१ महिला असल्याचे आढळून आले. अभ्यास क्षेत्रात २८४४ अनुसूचित जाती आहेत, ज्या एकूण लोकसंख्येच्या ४.११% आणि एकूण २२४४६ अनुसूचित जमाती आहेत, जे एकूण लोकसंख्येच्या ३२.४९% आहेत.

प्रकल्प क्षेत्रातील गावांमधील साक्षरता दर ७५.१३% (एकूण लोकसंख्येपैकी ६ वर्षांवरील) आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, एकूण ३१५८४ (४५.७२%) पैकी ६८.४% लोकसंख्या शेती आणि संलग्न कामामध्ये गुंतलेले आहे, त्यापैकी ३५.३५% शेतकरी आणि ३३.०५% शेतमजूर आहेत. लोकसंख्येपैकी फक्त काही टक्के लोक घरगुती उद्योगात गुंतलेले आहेत (३.४९%), आणि लोकसंख्येपैकी २८.०९% लोक इतर व्यवसाय, जसे की, व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, वाहतूक, सरकारी आणि खाजगी नोकऱ्यांमध्ये गुंतलेले आहेत.

शैक्षणिक सुविधा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. या सुविधांमुळे आर्थिक वाढ आणि रोजगार वाढतात. अभ्यास क्षेत्रात ८८ गावांमध्ये प्राथमिक शाळा, ४६ गावांमध्ये माध्यमिक शाळा, १३ गावांमध्ये माध्यमिक शाळा आणि ४ गावांमध्ये वरिष्ठ माध्यमिक शाळांचा समावेश आहे. अभ्यास क्षेत्रात महाविद्यालये नाहीत. सर्वात जवळची महाविद्यालये कर्जत शहरात आहेत जी अभ्यास क्षेत्राच्या गावांपासून १० किमी पेक्षा जास्त अंतरावर आहेत. अभ्यास क्षेत्रात, फक्त एका गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे आणि १६ गावांमध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहेत. तसेच अभ्यास क्षेत्रात टाटा पॉवर कंपनी लिमिटेड अंतर्गत कार्यरत असलेला एक दवाखाना आहे.

अभ्यास क्षेत्र गावे खडीचे रस्ते, पक्के रस्ते आणि पदपथांनी जोडलेली आहेत. नळाचे पाणी, हातपंप आणि विहिरी हे पिण्याच्या पाण्याचे प्रमुख स्रोत आहेत. अभ्यास क्षेत्रातील सर्व गावांमध्ये घरगुती वापरासाठी आणि शेतीसाठी वीजपुरवठा उपलब्ध आहे.

प्रस्तावित प्रकल्प स्थळाला लागून असलेल्या गावांचे सामाजिक-आर्थिक स्वरूप प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रात असलेल्या काही जवळच्या गावांचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण, नमुना-सर्वेक्षण आधारावर करण्यात आले. यामध्ये एकूण ११ गावांचा समावेश करण्यात आला. सर्वेक्षण गावांमध्ये एकूण ११,५८९ लोकसंख्या असून ३८१ अनुसूचित जाती आणि ४,६४९ अनुसूचित जमाती आहेत.

प्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये शेती आणि संबंधित कामे ही प्राथमिक कामे आहेत आणि स्थानिक रहिवासी शेतीसाठी प्रामुख्याने पावसाच्या व नदीच्या पाण्यावर अवलंबून असतात. शेतीव्यतिरिक्त गावकरी सरपण, आंबा, बेरी आणि मध गोळा करण्यासाठी जंगलात जातात.

गावात काही चांगल्या शैक्षणिक संस्था असल्याची नोंद झाली आहे. प्रत्येक गावात प्राथमिक शाळा आहेत, तर ७ गावात एक माध्यमिक शाळा, २ गावात हायस्कूल आहे. इतर गावातील विद्यार्थ्यांना हायस्कूल आणि उच्च माध्यमिक शाळेसाठी ५-१५ किमीपेक्षा जास्त प्रवास करावा लागतो. या परिसरात महाविद्यालये उपलब्ध नाहीत.

वैजिनाथ गावात एकच प्राथमिक आरोग्य उपकेंद्र असून, सर्वेक्षण केलेल्या परिसरात कोणतेही प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा रुग्णालय नाही. सर्वेक्षण केलेल्या गावांमध्ये बहुतांश घरांमध्ये नळ कनेक्शन उपलब्ध आहेत, तर काही गावांमध्ये पिण्यासाठी हातपंप आहेत. प्रकल्प क्षेत्रातील सर्व गावांमध्ये वीज पोहोचली आहे. तथापि, क्षेत्र सर्वेक्षणादरम्यान, काही गावांमध्ये अनियमित वीजपुरवठा असल्याचे लक्षात आल्याने ग्रामस्थ सौर पॅनेलची आवश्यकता व्यक्त करतात.

## ऑ. ऐतिहासिक, धार्मिक आणि पुरातत्व महत्वाची ठिकाणे

प्रस्तावित प्रकल्पाचा जवळच्या कोणत्याही महत्त्वाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळांवर परिणाम होणार नाही.

## ४. अपेक्षित पर्यावरणीय प्रभाव आणि उपाययोजना

### अ. पर्यावरणीय हवेची गुणवत्ता

**बांधकामाधीन कालावधीत होणारे परिणाम:** प्रकल्पस्थळाच्या आजूबाजूचे हवेचे वातावरण सध्या कोणत्याही महत्त्वाच्या प्रदूषण स्रोतापासून मुक्त आहे. बांधकामाधीन कालावधीत प्रकल्प क्षेत्रातील हवेच्या गुणवत्तेवर परिणाम करणारे स्रोत आणि क्रियाकलाप म्हणजे वाहनांची वाहतूक, सामग्री हाताळणी आणि साठवण, स्फोटकांचा वापर बांधकाम क्रियाकलापांसाठी स्फोट हेतूने करणे, गावातील कच्च्या रस्त्यांमुळे उद्भवणारी धूळ, बांधकाम प्रकल्प आणि यंत्रसामग्रीच्या ऑपरेशनसह बांधकाम क्रियाकलाप आणि घरगुती इंधन जाळणे इ होत.

